शिक्षा अंतीम करणे बाबत (श्री.बसवराज महारुद्र लिंबाळे ,
तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत- बारी,ता.अकोले)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/४२३/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र/ज्ञापन क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/४८०/२०२३ दिनांक-०३/०७/२०२३.
२.या कार्यालयाकडील सेवानिलंबन आदेश क्र.ग्रापं-३/४७९/२०२३,दि.०३/०७/२०२३
३. या कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३६/२०२४ दिनांक- २३/०१/२०२४ (चौकशी अधिकारी नियुक्ती)
४. या कार्यालयाकडील पुन:स्थापित आदेश क्र.ग्रापं-३/५६४२१५/२०२४,दि.०४/०९/२०२४
५. सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.४/खाचौ/ सी.आर.१७/२०२४, दिनांक- २४/०४/२०२५ प्राप्त दिनांक १७/०७/२०२५.
६. गटविकास अधिकारी पंचायत समिती नेवासा यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/६२९/२५, दिनांक २८/०५/२०२५.
७.या कार्यालयाची अंतीम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/१८६/२५,दि.२९/०९/२०२५.
८.गटविकास अधिकारी पंचायत समिती नेवासा यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/१६०/२६, दिनांक ०९/०२/२०२६.
९.या कार्यालयाचे पत्र क्र.ग्रापं-३/३१४/२०२६,दिनांक २०/०७/२०२६.
१०.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (५)

संदर्भ क्र.१ अन्वये,श्री.बसवराज महारुद्र लिंबाळे,तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत-बारी,ता. अकोले त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी दि.०१/१२/२०२२ पासुन अनाधिकृत गैरहजर असणे व मासिक सभेच्या तारखेला गैरहजर राहणे, या प्रकारचे गैरवर्तन केल्याने दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्र.३ नुसार श्री.बसवराज महारुद्र लिंबाळे,तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत-बारी,ता.अकोले यांचे गैरतर्वनाविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करण्यात आली होती.

संदर्भ क्र.५ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये पुढीलप्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत. श्री.बसवराज महारुद्र लिंबाळे,तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत-बारी,ता.अकोले यांनी विभागीय चौकशीकरीता हेतुपुरस्कर प्रकरणी विलंब करणे, चौकशी प्रक्रियेस सहकार्य न करणे तसेच त्यांचे स्वबचावाचे निवेदन सादर करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे श्री लिंबाळे यांचे वर चौकशी करण्यात आलेल्या दोन दोषारोपांपैकी दोन आरोप सिध्द झाले आहेत.

विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविलेली असल्याने श्री.बसवराज महारुद्र लिंबाळे,तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत-बारी, ता.अकोले यांनी कार्यालयीन कामी गैरहजर राहुन गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक)

नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे त्यांना संदर्भ क्र.७ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (५) नुसार सक्तीने सेवानिवृत्त करणे,ही शिक्षा अंतीम का करण्यात येऊ नये? याबाबतची अंतीम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. विहीत मुदतीत आपला खुलासा प्राप्त न झाल्यास या संदर्भात आपले काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन प्रस्तावीत कारवाई करण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे. संदर्भ क्र.८ अन्वये श्री.बसवराज महारुद्र लिंबाळे, तत्कालीन ग्रामसेवक यांची दि.०९/१०/२०२५ ची अंतीम कारणे दाखवा नोटीस रजिस्टर पोस्टाद्वारे प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. प्रकरणी श्री लिंबाळे यांनी सदर नोटीसचा खुलासा सादर केलेला नाही. यावरुन श्री लिंबाळे यांना अंतीम कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद केल्याप्रमाणे शिक्षा मान्य असल्याचे सिध्द होते. तसेच संदर्भ क्र.६ नुसार असे निर्दशनास आले की, संदर्भ क्र.४ च्या आदेशान्वये श्री लिंबाळे यांना पंचायत समिती नेवासा येथे पुन:स्थापित करण्यात आले होते. श्री लिंबाळे दि.१७/०९/२०२४ रोजी हजर होऊन अहवाल सादर केला होता. तद्नंतर श्री लिंबाळे पंचायत समिती नेवासा येथे गैरहजर आहे. यावरुन त्यांची काम करण्याची मानसिकता दिसून येत नाही.

सबब, श्री.बसवराज महारुद्र लिंबाळे, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत-बारी,ता.अकोले त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरहजर राहुन गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक)नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे श्री.बसवराज महारुद्र लिंबाळे,तत्कालीन ग्रामसेवक यांना देण्यात आलेल्या अंतीम कारणे दाखवा नोटीसमधील महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (५) नुसार मुदतीत सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त करणे, ही शिक्षा या आदेशान्वये अंतीम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 2026110408027 ..... असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 14:32:40
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-

१. श्री.बसवराज महारुद्र लिंबाळे,तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत-बारी, ता.अकोले द्वारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा.
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा.
   २/- सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अकोले.
४. कार्यासन १ व २ ग्रामपंचायत विभाग,जि.प.अहिल्यानगर.
५. निवड नस्ती.